# कला शाखा अभ्यास मंडळ उद्‌घाटन सोहळा

## अहवाल (सत्र २०२५-२०२६)

गोंदिया शिक्षण संस्थेद्वारा संचलित सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालयात कला शाखा अभ्यास मंडळाचा उद्घाटन सोहळा दि. 16 सप्टेंबर 2025 रोजी पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ राधेश्याम दिपटे हे उपस्थित होते. तर उद्घाटक म्हणून शारदा विद्यालयाचे प्राचार्य राहुल डोंगरे हे उपस्थित होते.

याप्रसंगी श्री राहुल डोंगरे म्हणाले की, "शिक्षण हे केवळ उदरनिर्वाहाचे माध्यम नसून ते चांगला माणूस घडविण्याचे सुद्धा महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणातून समग्र व्यक्तिमत्व विकास घडून प्रत्यक्ष वर्तन व्यवहार सुधारला पाहिजे. आजपर्यंत ग्रामीण भागातील व कला शाखेतील असंख्य विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश मिळविले आहे. त्यामुळे कला शाखेचे महत्त्व आपण ओळखायला हवे."

या कार्यक्रमात आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ राधेशाम दिपटे म्हणाले की, 'कला शाखा ही व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडणारी शाखा आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलागुणांना ओळखावे व त्या आधारे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणावा. या कार्यक्रमात कला शाखेचे प्रभारी डॉ जयंत कुमार मस्के यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणात्मक मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात कला शाखेतील विद्यार्थ्यांमधून कला शाखा अभ्यास मंडळ कार्यकारिणी तयार करण्यात आली. या कार्यकारिणीची घोषणा मराठी विभाग प्रमुख डॉ रेणुकादास उबाळे यांनी केली. तसेच विद्यार्थ्यांना पुढील कार्याची दिशा स्पष्ट करून दिली. विद्यार्थी कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी दीपेश राऊत, उपाध्यक्षपदी खुशबू बडवाईक व सचिवपदी रोहन उपलीकर या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमास कला शाखेतील डॉ राहुल भगत, डॉ गोल्डी बघमार, डॉ भारती काटेकाये, डॉ सुनीता राठोड, अरुणा बावनकर, सचिन वेरुळकर, राजेश दिपटे, प्रा अमोल खांदवे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी ए तृतीय वर्षातील विद्यार्थी दीपेश राऊत यांनी केले. प्रास्ताविक डॉ जयंत कुमार मस्के यांनी केले. तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ राजेंद्र बेलोकार यांनी आभार प्रदर्शन केले. पलक टेंभरे व

Scanned with OKEN Scanner

गुडिया ठवकर यांनी स्वागत गीत सादर केले. या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.















Belokar

Dr. R. O. Belokar

कार्यक्रम समन्वयक

Scanned with OKEN Scanner